

श्रीसमर्थरामदासस्वामिविरचितानि

# करुणाष्टकानि


(मूल-मराठी-श्लोक-सहितानुवादः।)



अनुवादकः- व.शं. नानिवडेकरः ।

(रामदासस्य किंकरः)

मूल्यम् १२ रूप्यकाः।



अयोध्या येथील रामजन्मभूमिच्या अतिप्राचीन मुख्य मूर्ति
चित्रकार शाहीर महादेव नारायण नानिवडेकर
श्री काळे रामजी मंदिर स्वर्गद्वार अयोध्या महाराष्ट्रीय संस्थान

श्रीसमर्थरामदासस्वामिविरचितानि

# करुणाष्टकानि



करुणाष्टकपद्यानां समर्थो वश्यवाक् कवि ः।
मन्दोऽनुवादकर्तास्मि रामदासस्य किंकर ः॥

अनुवादकः वसन्त : शंकरसुतो नानिवडेकरः।

© सर्वे अधिकाराः लेखकाधीनाः ।



## कृतज्ञता

अस्माकं संस्कृतसेवायाः उपक्रमं प्रोत्साहयितुम् श्रीमता सुभाषचन्द्र शरद्-चन्द्र गोपूजकर-महोदयेन स्वमातापित्रोः पुण्यस्मरणोद्देशेन एकाधिकसहस्रम् (१००१/- रूप्यकाणाम्) धनदानम् एतत्पुस्तकप्रकाशनार्थं दत्तम् यदर्थं वयमतीव कृतज्ञाः स्मः।

–संस्कृतस्य किंकरः।


प्रकाशन दिनांक ५ नोव्हेंबर २००६
त्रिपुरी पौर्णिमा (गुरु नानक जयंति)
संपर्क : वसंत शंकर नानिवडेकर
१-१८, गोरेगांवकर बिल्डींग, सेंट्रल प्लाझा
सिनेमाजवळ, गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५८०९९


## ॥ अर्पणपत्रिका ॥

मानसे हि जनकेन मूलतः
देववागभिरुचिर्विनिर्मिता।
शंकरस्य पदयोर्हि तस्य मे
अर्पये कृतिमिमाम् उमासुतः ॥

–वसन्तः





शुकासारिखें पूर्ण वैराग्य ज्यावें ।
वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचें ॥
कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा ।
नमस्कार माझा सद्गुरु रामदासा ॥

---

शुकाचार्यवद् योऽस्ति वैराग्यपूर्णः
वसिष्ठर्षिवज्-ज्ञानवान् यश्च योगी ।
कविर्मान्य एवास्ति वाल्मीकितुल्य :
प्रणामोऽस्तु मे रामदासाय तस्मै ॥



## ॥श्रीसमर्थ-रामदास-स्वामिनाम् संक्षिप्तं चरित्रम्॥

अस्ति निजामराज्यम् इति पूर्वकालविश्रुतप्रदेशे महाराष्ट्रे गोदावर्याः तीरे 'जाम्ब' इति ग्रामः । तत्र निवसतां कुळकर्णीमहोदयानां कुले शके १५३० इति शालिवाहनसंवत्सरे श्रीसमर्थ-रामदासः जन्म प्राप्तवान् । श्रीसमर्थ-स्वामिनाम् मातापितरौ राणूबाई-सूर्याजीपन्तौ ईश्वरभक्तिपरायणौ । 'नारायण' इति श्रीसमर्थानां मूलनाम । बाल्ये एव व्रतबन्धसंस्कारम् अधिगत्य वयसः द्वादशे वर्षे मातुराज्ञां पालयितुं विवाहवेदिकाम् आरूढः नारायणः विप्रमुखात् 'सावधान' इति शब्दं श्रुत्वा विवाहमण्डपात् पलायनं कृतवान् । ततः 'टाकळी'-ग्रामे सः गायत्रीपुरश्चरणतपः आचरत् ।

द्वादशवर्षाणि यावत् अखिलदेशभ्रमणं समाचरन्, तीर्थयात्राश्च कृत्वा सः विविधस्थानेषु हनुमन्मन्दिराणि तथा मठान् प्रस्थापितवान् शिष्यसम्प्रदायं च वृध्दिं नीतवान् । श्रीसमर्थसत्कीर्तिं श्रुत्वा श्रीशिवराजः तद्दर्शनं कृत्वा तं स्वगुरुं मत्वा तस्य शिष्यत्वं स्वीकृतवान्। श्रीसमर्थानां देहयष्टिः अतीव सुदृढा भव्या च आसीत् । तेषां वदने ब्रह्मचर्यस्य समूर्त तेजः विलसति स्म । श्रीसमर्थाना निवासः 'चाफळ' - ग्रामे अवर्तत । परम् अनन्तरम् श्रीशिवप्रभोः अनुरोधात् ते 'सज्जनगड' इत्यत्र निवासम् कुर्वन्ति स्म । श्रीशिवनृपस्य देहावसानानन्तरम् श्रीसमर्थस्वामिनः शके १६०३ इति शालिवाहन-संवत्सरे सज्जनगड-पुण्यक्षेत्रे समाधिस्थाः अभवन्। ।। ''जय जय रघुवीर समर्थ'' ।।



## अनुवादकाचे मनोगत

१९९५ साली विषमज्वराने अत्यंत पीडित असल्यामुळे डॉक्टरांनी अंथरुणावरून उठण्याचीहि अनुज्ञा दिली नव्हती. इतर कांहीच करतां येत नसल्यामुळे विरंगुळा म्हणून श्रीसमर्थांची करुणाष्टके वाचावयास घेतली होती. एके दिवशी वाचतां वाचतां अचानकपणे 'अनुदिन अनुतापे' हा प्रथम श्लोक संस्कृतमधून मुखांतून बाहेर पडला व एक अवर्णनीय आनंद झाला. पुढे वाचूं लागलो तो एक एक श्लोक संस्कृतरूप घेऊन आपोआप मुखावाटे बाहेर पडू लागला. असे १०/१५ श्लोक संस्कृतांत झाले. ही समर्थकृपा समजून आपण करुणाष्टकांना संस्कृत साज चढवावा असे मनाने घेतले व त्या महिन्याभराच्या काळांत प्रसिद्ध अशी आठहि करुणाष्टके अनुवादित केली. मग हा एक छंदच लागला व त्यानंतर जे जे अन्य भाषांमध्ये सुविचार सुभाषितमय आहे, भावमय आहे ते ते संस्कृतमध्ये आणून सोडावे असा नाद लागला.

ही करुणाष्टके आमचे पितृतुल्य शेजारी कै.श्री.गं.मो. तथा काका जोगळेकर यांना फार आवडली होती. प्रसिद्ध संस्कृत उपासक कै.श्री.ल.म.चक्रदेव व कै.श्री.दारशेतकर गुरुजी यांनी ती वाचून समाधान व्यक्त केले. संस्कृतशारदम् नाटकाचे लेखक कै.श्री. बा.का. लिमये यांनी अनुवाद आपल्या चोखंदळ दृष्टीने तपासून कांही मौलिक सूचना केल्या. वरील सर्वांच्या प्रोत्साहनामुळे हे काम तडीस जाऊ शकले.

सदर अनुवाद अनेक वर्षापूर्वीच सज्जनगड मासिक पत्रिकेत क्रमशः प्रसिध्द झाला. तो विख्यात समीक्षक कै.श्री.रा.टिकेकर ह्यांच्या अवलोकनांत आला व त्यांनी त्याबद्दल कौतुक व्यक्त केले. तसेच छपरा (बिहार) येथील संस्कृत मातृभाषी संस्कृतोपासक श्री.कपिलदेव शर्मा यांनी हि तो वाचून समाधान व्यक्त केले. वरील दोनहि मान्यवर विद्वानांनी या छोट्या वाङ्मयीन अपत्याला आपले मंगल आशीर्वाद देऊन त्याला बाळलेणे चढविले आहे. त्यांचे आभार न मानतां



त्यांच्या ऋणांत राहून त्यांनी अपेक्षिल्याप्रमाणे अधिकाधिक संस्कृतसेवा करीत राहणे हेच मला अधिक श्रेयस्कर वाटते.

कै.श्री.कबनूरकर यांनीही आपल्या संस्कृत पाठशाळेत विद्यार्थ्यांसाठी नित्यपाठासाठी उपयोगी पडावे म्हणून हे पुस्तक मुद्रित करावयाचे ठरविले होते. हेहि श्रीसमर्थ कृपेचे फळ आहे. अशी माझी धारणा आहे.

पुस्तकांतील रामपंचायतनाचे चित्र सुप्रसिद्ध महाराष्ट्र शाहीर कै. महादेव नारायण नानिवडेकर यांनी काढलेले रेखाचित्र आहे. त्यामुळे पुस्तकाच्या सजावटीमध्ये अधिक भर पडली आहे.

पुस्तकाची छपाई मुखपृष्ठ इत्यादि सर्व गोष्टी श्री. हरि जोगळेकर यांनी व्यवस्थित पार पाडल्या आहेत. त्याबद्दल त्यांचे ऋण मानावे तेवढे थोडेच होईल. श्रीसमर्थ भक्तांना व देववाणी संस्कृतच्या रसिकांना हे पुस्तक आवडो अशी श्रीसमर्थ चरणी प्रार्थना करून मनोगत पुरे करतो.

– व.शं.नानिवडेकर

॥ श्रीसोमेश्वर प्रसन्न ॥

शाहीर वसंत शंकर नानिवडेकर
नानिवडेकर शाहिरी संगम
१/१८, गोरेगावकर लेन, गिरगांव, मुंबई.

माननीयेभ्यः टिकेकरमहोदयेभ्यः

सादरं नमः। मया कृतः श्रीरामदासविरचितानां करुणाष्टकानां समश्लोकः संस्कृतानुवादः इदानीं मुद्रणावस्थायां वर्तते।

भवद्भिः पूर्वमेव सज्जनगडमासिकपत्रिकायां प्रसिद्धः सः अनुवादः पठितोऽस्ति। तथापि तस्य एका प्रतिः पुनरवलोकनार्थं प्रेष्यते। तस्मिन् विद्यमानाः मुद्रणदोषाः प्रकाशनीयपुस्तकात् निष्कास्येरन्।

अपि भवन्तः आशीर्वादात्मकं प्रास्ताविकं किमपि लिखित्वा मां अनुग्राहयेयुः। आशीर्वादः मराठी संस्कृतयोः अन्यतरस्यां भाषायां भवतु। शेषं कुशलम्।

भवदीयः
व.शं.नानिवडेकरः



# प्रस्तावना

शाहीर वसंतराव नानिवडेकर यांचा हा नवा उद्योग मधुर फलदायी ठरला आहे. वारंवार घासून पुसून धार लावून हत्यार चकचकीत ठेवावे तसे त्यांनी आपले संस्कृतवरील प्रभुत्व चकचकीत ठेवले आहे.

भाषेला धार लावण्यासाठी त्यांनी निवडली समर्थ रामदासांची करुणाष्टके. ती सर्व सुबोध समवृत्त संस्कृत स्वरूपांत उतरविली. करुणाष्टके ही मूळांतच साधी, करुणेने ओथंबलेली. त्यांत काव्यापेक्षा मनाची व्यथाच अधिक व्यक्त झाली असल्याने ती यथातथ्य रीतीने देववाणीतही उमटली आहे. हे शाहीर कवींचे कौशल्य प्रत्येक ओळीत जाणवते. संस्कृत आरत्यानंतर करुणाष्टके हवीतच. या सुसंस्कृत प्रयोगाबद्दल त्यांची पाठ थोपटली पाहिजे.

आमच्या संत कवीत समर्थ रामदास म्हणजे अगदी निराळे - औरोंसे न्यारे ! बहुतेक संताना ध्यास विठ्ठल भक्तीचा. रामदासांना मात्र ध्यास होता धनुर्धर

रामचंद्राचा. हनुमान देखील त्यांचा आवडता देव. पण तो सर्वत्र असतो तसा हात जोडलेला दास हनुमान नव्हे. रामदासांचा वीर हनुमान. त्यांचीच मंदिरे त्यांनी देशभर स्थापली म्हणून समर्थ रामदास इतर संताहून निराळे वाटतात. सर्व संत महंतांत वेगळे उठून दिसतात. त्यांचे मनाचे श्लोक एका पंडिताला इतके आवडले की त्याने यांचा अनुवाद कानडी व इंग्रजी करुन ती पुस्तके मोफत वाटली. नानिवडेकरानी करुणाष्टकांना संस्कृत पेहराव चढविला. त्यांत त्यांची आवड तर व्यक्त झालीच पण करुणाष्टकांशी मिळती जुळती मनोवृत्ती देखील आम्हांस समजली म्हणूनच त्यांना ही तन्मयना साधली. असो.

शाहीरांचा आवडता वीर रस असतां, आमचे हे नानिवडेकर शाहीर करुण रसाकडे कसे व कां वळले याची कांही तरी सबळ कारणे असतीलच. पण पाठांतराला सहज उपयोगी असे साहित्य तयार करणारे श्री. वसंतराव नानिवडेकर लोकादरास पात्र ठरतात. अनेकांनी त्यांचे ऋण प्रकटरीत्या मानले आहे. पुढेही मानत रहातील.



करुणाष्टकातला साधेपणा संस्कृत स्वरूपांतही कायम आहे. हे वेषांतराचे वैशिष्ट्य म्हटले पाहिजे.

१ वृथा जात एवास्मि दासः प्रभो ते
(तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलो)

२ रघूणांपते केवलं याच्यमेतत्
(रघूनायका मागणे हेचि आता)

३ बुद्धिं मे देहि राघव
(बुद्धि दे रघुनायका)

या ओळीवरून नानिवडेकरांच्या सुबोध संस्कृतची ओळख होते.

मराठी काव्य देववाणीत उतरविण्याची परंपरा महाराष्ट्रांत नवी नाही. पुण्यांतील ओक गुरुजीनी घालून दिलेला धडा गिरविण्यांत अनेकांनी स्वतःला धन्य मानले आहे. त्या गुरुजीनी ज्ञानेश्वरीचा संस्कृत अनुवाद आरंभिला होता. मराठी संगीत नाटकांना संस्कृत रंगमंचावर मिरविण्यासाठी त्यांमधील पद्ये देखील समवृत्तांची केली होती. त्यामुळे ती ऐकतांना संस्कृतची

अडचण वाटली नाही. उलट एक आगळा आनंद वाटला शारदा मासिकांतून तुका म्हणे असे कांही अभंग संस्कृत स्वरूपांत झळकतात. शाहीर नानिवडेकरांचे असे समानधर्मे अनेक आहेत. मात्र अनुवादासाठी काय निवडावे याबाबत त्यांचे चातुर्य इतरांपेक्षा निराळे आहे. हा स्वतःच्या मनोविनोदाचा आणि इतरांना आनंद देणारा व्यवसाय अव्याहत चालू ठेवावा. एवढेच त्यांना सांगावयाचे.

आषाढी (ता. १९.०७.७५) श्री.रा.टिकेकर



# शुभेच्छा

॥सर्वे भवन्तु सुखिनः॥

लोक-मान्य-नगरम्

आचार्य कपिलदेव शर्मा, छपरा (बिहार)

द्वारा श्री.ल.म.चक्रदेवस्य श्रीवत्स-बालमन्दिरम्, मुंबई

श्रीसमर्थ-रामदास-स्वामि-रचितानि करुणाष्टकानि वीर-विद्वत्-प्रसवि-महाराष्ट्रे सर्वजन-विदितानि । तेषां मध्ये अतित्र प्रसिद्धानाम् अष्टानां करुणाष्टकानां सम-श्लोकः संस्कृताऽनुवादः कविवर्येण श्रीवसन्तराय-नानिवडेकर-महोदयेन कृतो वर्तते । स पूर्वम् सज्जनगड मासिक पत्रिका इति मासिके प्रसिद्धिं गतः ।

स एव, साम्प्रतं, पुस्तकरूपेण संस्कृतानुरागिणां समर्थभक्तानां पुरतो विराजते । अस्य अनुवादस्य भाषा सरसा, सुरसा, सरला च । अनुवादरूपमपि इदं पुस्तकं सर्वथा मौलिकम् इव अतितराम् आनन्दयति मे मनः ।

स्वाभाविकोऽयं सुकविः नाऽततिरेणैव सावरकर-विजयम् अन्यद् वा किमपि वीररसपूर्णं संस्कृत-महाकाव्यं प्रणीय युगकालिदास इति पदवीभाग् भूयात् इति मे हार्दिकं शुभाऽऽशंसनम् ।

कवेः करुणाष्टक-पाठ-प्रीतः श्रीकपिलदेव शर्मा

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

श्रीसमर्थरामदासस्वामिकृत

# करुणाष्टकें

## अष्टक १ लें (मालिनीवृत्त)

अनुदिन अनतापें तापलों रामराया ।
परमदिनदयाळा नीरसीं मोहमाया ॥
अचपळ मन माझें नावरे आवरीतां ।
तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां ॥१॥

भजनरहित रामा सर्वही जन्म गेला ।
स्वजनजनधनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला ॥
रघुपति मति माझी आपुलीशी करावी ।
सकळ त्यजुनि भावें कास तूझी धरावी ॥२॥



॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

श्रीसमर्थरामदासस्वामिविरचितानि

# करुणाष्टकानि ।

## अष्टकं प्रथमम् (मालिनीवृत्तम्)

अनुदिनमनुतापेनास्म्यहं राम तप्तः
परमकरुण मोहं छिन्द्धि मायासमेतम् ।
इदमतिचपलं मे मानसं दुर्निवारम्
भवति च बहुखेदस्त्वां विना धाव शीघ्रम् ॥१॥

भजनविरहितं मे सर्वमायुर्विनष्टम्
स्वजनजनधनार्थं यत्नशीलो वृथाऽहम् ।
मतिरियमधुना मे त्वत्परा राम कार्या
सकलजगदपास्य त्वां हि भक्त्याऽऽश्रयेयम्
॥२॥

विषयजनित सूखें सौख्य होणार नाहीं ।
तुजविण रघुनाथा वोखटें सर्व कांहीं ॥
रविकुळटिळका रे हीत माझें करावें ।
दुरित दुरि हरावें स्वस्वरूपीं भरावें ॥३॥
तनु मन धन माझें राघवा रूप तुझें ।
तुजविण मज वाटे सर्व संसार वोझें ॥
प्रचळित न करावी सर्वथा बुद्धि माझी ।
अचळ भजनलीळा लागली आस तूझी ॥४॥
चपळपण मनाचे मोडितां मोडवेना ।
सकळ स्वजनमाया तोडितां तोडवेना ॥
घडि घडि विघडे हा निश्चयो अंतरींचा ।
म्हणउनि करुणा हे बोलतों दीन वाचा ॥५॥
जळत हृदय माझें जन्म कोट्यानकोटी ।
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटीं ॥



विषयजनितसौख्यात् नैव सौख्यं यथार्थम्
असदिदमखिलं हि त्वां विना वस्तुजातम् ।
रविकुलतिलक त्वं मे हितं रक्ष नित्यम्
दुरितमपहरन् मे देहि सायुज्यभावम् ॥३॥
तनुधनहृदयं मे राम ! रूपं त्वदीयम्
जगदिदमपि मन्ये त्वां विना भारभूतम् ।
न च न च चपलत्वं मन्मतौ जातु जन्यम्
अचलभजनसङ्गिन् सोत्सुकोऽहं त्वदर्थम्
॥४॥
हृदयतरलता मे शक्यते नैव मोक्तुम्
स्वजनहितरतत्वं शक्यते नैव हातुम् ।
प्रतिपलमयमन्तर्निश्चयो याति भङ्गम्
इति करुणमिदानीं राघव प्रार्थयेऽहम् ॥५॥
दहति हृदयमेतज्जन्मकोटीर्मदीयम्
मयि निजकरुणाया वाहय त्वं महौघम् ।

तळमळ निववीं रे राम कारुण्यसिंधु ।
षडरिपुकुळ माझें तोडि याचा विरोधु ॥६॥
तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी ।
सिणत सिणत पोटीं पाहिली आस तूझी ॥
झडकरि झड घाली धांव पंचानना रे ।
तुजविण मज नेते जंबुकी वासना रे ॥७॥
सबळ जनक माझा राम लावण्यपेटी ।
म्हणउनि मज पोटीं लागली आस मोठी ॥
दिवस गणित बोटीं प्राण ठेवूनि कंठीं ।
अवचट मज भेटी होत घालीन मीठी ॥८॥
जननिजनकमाया लेकरुं काय जाणे ।
पय न लगत मूखें हाणतां वत्स नेणें ॥
जळधरकण आशा लागली चातकासी ।
हिमकर अवलोकी पक्षिया भूमिवासी ॥९॥



प्रशमय करुणाब्धे राम मे व्याकुलत्वम्
षडरिकुलविरोधं राम मे छिन्द्धि तूर्णम् ॥६॥
अपि सदयदृशा मां को नु पश्येदृते त्वाम्
इति च मृगयमाणस्त्वामहं श्रान्त आसम् ।
झटिति मदवनार्थं धाव पञ्चानन त्वम्
अपनयति विना त्वां वासनाजम्बुकी माम् ॥७॥
सबलरुचिरगात्रो मे पिता रामचन्द्रः
इति खलु रघुवीर त्वत्प्रतीक्षा कृताऽस्ति ।
दिनगणनपरोऽस्मि व्याकुलोऽहं त्वदर्थम्
मिलसि च सहसा चेत् त्वां
समालिङ्गिताऽस्मि ॥८॥
जननिजनकयोः किं वेत्ति वत्सो ममत्वम्
अपि भवति पयः किं ताडनादूधसो गोः ।
जलदनिहितदृष्टिश्चातको जीवनार्थम्
सुखयति तु चकोरं रश्मिवृष्ट्या हिमांशुः ॥९॥

तुजविण मज तैसें जाहलें देवराया ।
विलग विषमकाळीं तूटली सर्व माया ॥
सकळजनसखा तूं स्वामि आणीक नाहीं ।
वमकवमन जैसें त्यागिलें सर्व कांही ॥१०॥
स्वजनजनधनाचा कोण संतोष आहे ।
रघुपतिविण आतां चित्त कोठें न राहे ॥
जिवलग जिव घेती प्रेत सांडूनि देती ।
विषय सकळ नेती मागुता जन्म देती ॥११॥
सकळ जन भवाचें आखिले वैभवाचे ।
जिवलग मग कैचें चालतें हेंचि साचें ॥
विलग विषमकाळीं सांडिती सर्व माळी ।
रघुविर सुखदाता सोडवी अंतकाळीं ॥१२॥
सुख सुख म्हणतां हें दुःख ठाकूनि आलें ।
भजन सकळ गेलें चित्त दुश्चित्त जालें ॥
भ्रमित मन कळेना हीत तें आकळेना ।
परम कठिण देहीं देहबुद्धी वळेना ॥१३॥



अहमपि किल दीनस्त्वां विना दीनबन्धो
विषमसमयमग्नो ज्ञातिभिस्त्यक्तसङ्गः ।
सकलजनसुहृत् त्वं नास्ति मेऽन्यः शरण्यः
वमनमिव किलाहं त्यक्तवान् विश्वमेतत् ॥१०॥
स्वजनजनधनेभ्यो नैव सन्तोषलाभः
न च खलु रमते मे राघवात् क्वाऽपि चित्तम् ।
प्रियजनसुहृदस्ते ये परेतं त्यजन्ति
जनयति च पुनः सा मानवं भोगतृष्णा ॥११॥
ननु विभवनिमग्ना सन्ति सर्वे मनुष्याः
निजपरगणनायां नास्ति किञ्चिद्धि सारम् ।
प्रियजनसुहृदोऽस्मान् आपदायां त्यजन्ति
ननु रघुपतिरेको मुक्तिसौख्यप्रदाता ॥१२॥
सुखमिति च यदुक्तं तच्च दुःखस्वरूपम्
भजनमपि न शिष्टं जातखेदं च चित्तम् ।
भ्रमति मम मनः किं स्यात् हितं वाऽहितं वा
न भवति खलु नष्टो देहिनो देहभावः ॥१३॥

उपरति मज रामीं जाहली पूर्णकामीं ।
सकळभ्रमविरामीं राम विश्रामधामीं ॥
घडिघडि मन आतां रामरूपीं भरावें ।
रविकुळटिळका रे आपुलेसें करावें ॥१४॥
जळचर जळवासी नेणती त्या जळासी ।
निशिदिन तुजपासीं चूकलों गूणरासी ॥
भुमिधरनिगमांसी वर्णवेना जयासी ।
सकळभुवनवासी भेटि दे रामदासीं ॥१५॥

★

## अष्टक २ रें (भुजंगप्रयातवृत्त)

असंख्यात ते भक्त होऊनि गेले ।
तिहीं साधनांचे बहू कष्ट केले ॥
नव्हे कार्यकर्ता भुमीभार जालों ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥१॥



उपरतिरधुना ते पूर्णकामेऽपि रामे
भ्रमविकृतिनिरासे राघवे शान्तिधाम्नि ।
प्रतिपलमथ चित्तं यातु रामस्वरूपम्
रघुकुलतिलक ! त्वं मां नय
स्वात्मभावम्॥१४॥
जलमिव जलवासाः प्राणिनो नाद्रियन्ते
अहमपि निकटस्ते वेद न त्वां गुणाब्धे ।
क्षितिधरनिगमास्ते वर्णने श्रान्तवाचः
सकलभुवनवासिन् पश्य मां रामदासम् ॥१५॥

★

## अष्टकं द्वितीयम् (भुजङ्गप्रयातवृत्तम्)

असंख्या हि भक्ताः पुरा ते बभूवुः
तपःसाधनार्थं भृशं यत्नवन्तः ।
न वै कार्यकर्ता परं भूमिभारः
वृथा जात एवास्मि दासः प्रभो ते ॥१॥

बहू दास ते तापसी तीर्थवासी ।
गिरीकंदरीं भेटि नाहीं जनांसी ॥
स्थिती ऐकतां थोर विस्मीत जालों ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥२॥

सदा प्रेमराशी तयां भेटलाशी ।
तुझ्या दर्शनें स्पर्शनें सौख्यराशी ॥
अहंता मनीं शब्दज्ञानें बुडालों ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥३॥

तुझ्या प्रीतिचे दास जन्मास आले ।
असंख्यात ते कीर्ति बोलोनि गेले ॥
बहू धारणा थोर चक्कीत जालों ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥४॥



अनेके हि दासर्षयस्तीर्थवासाः
गिरौ कन्दरे ये विविक्तं भजन्ते ।
भृशं विस्मितस्तच्चरित्राणि शृण्वन्
वृथा जात एवास्मि दासः प्रभो ते ॥२॥

सदा सङ्गतास्ते त्वया प्रेमराशे
सुखं दर्शनात् स्पर्शनात् प्राप्तवन्तः ।
अहंभावनाशब्दजम्बालमग्नः
वृथा जात एवास्मि दासः प्रभो ते ॥३॥

तव प्रीतिदासा अनेके हि दासाः
जगुस्तेऽमितां दिव्यकीर्तिं प्रभो वै ।
भृशं तन्मतिं दृष्टवान् विस्मितोऽहम्
वृथा जात एवास्मि दासः प्रभो ते ॥४॥

बहूसाल देवालयें हाटकाचीं ॥
रसाळा कळा लाघवें नाटकाची ॥
पुजा देखतां जाड जीवीं गळालों ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥५॥
कितेकीं देह त्यागिले तूजलागीं ।
पुढें जाहले संगतीचे विभागी ॥
देहेदुःख होतांचि वेगीं पळालों ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥६॥
किती योगमूर्ती किती पुण्यमूर्ती ॥
किती धर्मसंस्थापना अन्नशांती ॥
पस्तावलों कावलों तप्त जालों ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥७॥
सदासर्वदा राम सोडोनि कामीं ।
समर्था तुंझे दास आम्ही निकामी ॥



असंख्यानि वै स्वर्णवन्मन्दिराणि
सुरम्याः कलाः कौशलं नाटकानाम् ।
समीक्ष्यार्चनां चेतसि व्रीडितोऽहम्
वृथा जात एवास्मि दासः प्रभो ते ॥५॥
अनेके च ते त्यक्तदेहास्त्वदर्थम्
बभूवुः कृतार्थास्त्वया प्राप्तसङ्गाः ।
अहं धावितो देहदुःखार्दितः सन्
वृथा जात एवास्मि दासः प्रभो ते ॥६॥
प्रभूतान् महायोगिनः पुण्यभावान्
तथा धर्मसंस्थापना अन्नशान्तिम् ।
प्रपश्यन् सुतप्तश्च खिन्नश्च जातः
वृथा जात एवास्मि दासः प्रभो ते ॥७॥
परित्यज्य रामं सदा वासनायाम्
अकिञ्चित्करास्ते प्रभो किङ्कराः स्मः ।

बहु स्वार्थबुध्दी नरें कष्टवीलों ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥८॥

★

## अष्टक ३ रें (भुजंगप्रयातवृत्त)

नसे भक्ति ना ज्ञान ना ध्यान कांहीं ।
नसे प्रेम हें राम विश्राम नाहीं ॥
असा दीन अज्ञान मी दास तूझा ।
समर्था जनीं घेतला भार माझा ॥१॥
रघूनायका जन्मजन्मांतरीचा ।
अहंभाव छेदोनि टाकीं दिनाचा ॥
जनीं बोलती दास या राघवाचा ।
परी अंतरी लेश नाहीं तयाचा ॥२॥
रघूनायका दीन हाती धरावे ।
अहंभाव छेदोनियां उध्दरावे ॥



भृशं स्वार्थबुद्ध्या हताशोऽनुतप्तः
वृथा जात एवास्मि दासः प्रभो ते ॥८॥

★

## अष्टकं तृतीयम् (भुजङ्गप्रयातवृत्तम्।)

न भक्तिर्न विद्या न मे ध्यानमस्ति
न विश्राम एवापि नो प्रेम राम ।
अहं दीनदासस्तव ज्ञानहीनः
समर्थैर्जनैः स्वीकृतो मेऽस्ति भारः ॥१॥
रघूणां पते पूर्वजन्मर्जितां मे
अहम्भावनां छिन्द्धि दीनस्य तूर्णम् ।
अहं ते श्रुतः सेवको राम लोके
न तु स्वल्प एवापि चित्ते त्वदंशः ॥२॥
रघूणां पते स्वीकुरुष्वेह दीनान्
अहंतां समुच्छिद्य तानुद्धरस्व ।

अगूणि तयालगिं गूणी करावें ।
समर्थें भवसागरीं ऊतरावें ॥३॥
किती भार घालूं रघूनायकाला ।
मजकारणें शीण होईल त्याला ॥
दिनानाथ हा संकटी धांव घाली ।
तयाचेनि हे सर्व काया निवाली ॥४॥
मला कोंवसा राम कैवल्यदाता ।
तयाचेनि हे फीटली सर्व चिंता ॥
समर्था तया काय उत्तीर्ण व्हावें ।
सदासर्वदा नाम वाचे वदावें ॥५॥
दिनाचें उणें दीसतां लाज कोणा ।
जगीं दास दीसे तुझा दैन्यवाणा ॥
शिरीं स्वामि तूं राम पूर्णप्रतापी ।
तुझा दास पाहीं सदा शीघ्र कोपी ॥६॥

★



गुणैर्ये वियुक्ता गुणान् देहि तेभ्यः
समर्थान् भवाम्भोधिपारं नयस्व ॥३॥
रघूणां पतिर्मेऽतिभारं बिभर्ति
भवेत्कारणान्मे श्रमस्तस्य हन्त ।
अयं त्रायते दीननाथो विपत्तौ
स एव प्रशान्तं विधत्ते मदङ्गम् ॥४॥
अयं राघवः कोमलो मुक्तिदो मे
अतः सर्वचिन्ता गताश्चित्तजा मे ।
कथं वाऽनृणी स्यामहं राघवस्य
प्रभोर्नाम नित्यं हि सङ्कीर्तनीयम् ॥५॥
लघुत्वाद्धि दीनस्य कस्य त्रपा स्यात्
जगत्यस्मि ते किङ्करो दीनदीनः ।
प्रभुस्त्वं परो राम पूर्णप्रतापी
परं किङ्करस्ते सदा शीघ्रकोपी ॥६॥

★

## अष्टक ४ थें (भुजंगप्रयातवृत्त)

उदासीन हे वृत्ति जीवीं धरावी ।
अती आदरें सर्व सेवा करावी ॥
सदा प्रीति लागो तुझे गूण गातां ।
रघूनायका मागणें हेंचि आतां ॥१॥
तुझें रूपडें लोचनीं म्यां पहावें ।
तुझे गूण गातां मनासी रहावें ॥
उठो आवडी भक्तिपंथेंचि जातां ।
रघूनायका मागणें हेंचि आतां ॥२॥
मनीं वासना भक्ति तूझी करावी ।
कृपाळूपणें राघवें पूरवावी ॥
वसावें मज अंतरी नाम घेतां ।
रघूनायका मागणें हेंचि आतां ॥३॥



## अष्टकं चतुर्थम् (भुजङ्गप्रयातवृत्तम्।)

विरक्तिः स्वजीवे सदा चेतसि स्यात्
तथा सादरं सर्वसेवा विधेया ।
गुणान् गायतस्ते त्वयि प्रीतिरास्ताम्
रघूणां पते केवलं याच्यमेतत् ॥१॥
सदा चक्षुषी पश्यतां ते स्वरूपम्
गुणान् गायतस्ते मनःस्थैर्यमस्तु ।
रुचिर्जायतां भक्तिमार्गेण गन्तुम्
रघूणां पते केवलं याच्यमेतत् ॥२॥
अहं कामये राघव त्वां भजेयम्
कृपालो रघूणां पते पूरयेच्छाम् ।
हृदिस्थो भव त्वं यदा त्वां स्तवीमि
रघूणां पते केवलं याच्यमेतत् ॥३॥

सदा सर्वदा योग तुझा घडावा ।
तुझे कारणीं देह माझा पडावा ॥
नुपेक्षी मज गूणवंता अनंता ।
रघूनायका मागणे हेंचि आता ॥४॥
नको द्रव्यदारा नको येरझारा ।
नको मानसीं ज्ञानगर्वें फुगारा ॥
सगूणीं मज लाविं रे भक्तिपंथा ।
रघूनायका मागणें हेचि आतां ॥५॥
भवें व्यापलों प्रीतिछाया करावी ।
कृपासागरें सर्व चिंता हरावी ॥
मज संकटीं सोडवावें समर्था ।
रघूनायका मागणें हेंचि आता ॥६॥
मनीं कामना कल्पना ते नसावी ।
कुबुद्धि कुडी वासना नीरसावी ॥



प्रभो प्रत्यहं सङ्गमः स्यात् त्वया मे
त्वदर्थं च मे देहपातः किलास्तु ।
उपेक्षस्व मा त्वं गुणिन् मामनन्त
रघूणां पते केवलं याच्यमेतत् ॥४॥
पुनर्जन्म नेच्छामि नो द्रव्यदारान्
न वाऽऽडम्बरं ज्ञानगर्वस्य चित्ते ।
नयस्वेश मां भक्तिमार्गं गुणाढ्यम्
रघूणां पते केवलं याच्यमेतत् ॥५॥
भवव्यापृतोऽहं कुरु प्रेमवृष्टिम्
कृपाब्धेऽखिलामाशु चिन्तां हरस्व ।
प्रभो त्राहि मां सङ्कटैर्बाध्यमानम्
रघूणां पते केवलं याच्यमेतत् ॥६॥
न चित्तेऽस्तु दुष्कामना कल्पना वा
निरस्या कुबुद्धिः स्पृहा चापि दुष्टा ।

नको संशयो तोडिं संसारव्यथा ।
रघूनायका मागणें हेंचि आतां ॥७॥
समर्थापुढें काय मागों कळेना ।
दुराशा मनीं बैसली हे ढळेना ॥
पुढें संशयो नीरसीं सर्व चिंता ।
रघूनायका मागणें हेंचि आतां ॥८॥
ब्रिदाकराणें दीन हातीं धरावे ।
म्हणे दास भक्तांसि रे उद्धरावे ॥
सुटो ब्रीद आम्हांसि सांडूनि जातां ।
रघूनायका मागणें हेंचि आतां ॥९॥

★

## अष्टक ५ वें (अनुष्टुप्वृत्त)

युक्ति नाहीं बुद्धि नाहीं । विद्या नाहीं विवेकिता॥
नेणता भक्त मी तुझा । बुद्धि दे रघुनायका ॥१॥



गृहस्थव्यथां छिन्द्धि मा संशयोऽस्तु
रघूणां पते केवलं याच्यमेतत् ॥७॥
समर्थो हि किं याचितव्यो न जाने
दुराशा न मां मुञ्चतेऽद्यापि हृत्स्था ।
प्रभो संशयं छिन्द्धि चिन्तां च सर्वाम्
रघूणां पते केवलं याच्यमेतत् ॥८॥
प्रभो पाहि दीनान् प्रतिज्ञातसिध्द्यै
स्वभक्तान् समुद्धारयेत्याह दासः ।
प्रतिज्ञा विनश्येत् यदस्मान् जहीथाः
रघूणां पते केवलं याच्यमेतत् ॥९॥

★

## अष्टकं पञ्चमम् (अनुष्टुब्वृत्तम्)

युक्तिर्नास्ति मतिर्नास्ति न विद्या न विवेकिता।
अहमज्ञश्च ते भक्तो बुद्धिं मे देहि राघव ॥१॥

मने हें आवरेना कीं । वासना वावडे सदा ॥
कल्पना धांवते सैरा । बुद्धि दे रघुनायका ॥२॥
अन्न नाही वस्त्र नाहीं । सौख्य नाहीं जनांमध्ये।
आश्रयो पाहतां नाहीं । बुद्धि दे रघुनायका ॥३॥
बोलतां चालतां येना । कार्यभाग कळेचिना ॥
बहु मी पीडलों लोकीं । बुद्धि दे रघुनायका ॥४॥
तुझा मी टोणपा जालों । कष्टलों बहुतापरी ॥
सौख्य तें पाहता नाहीं । बुद्धि दे रघुनायका॥५॥
नेटकें लिहितां येना । वाचितां चुकतों सदा ॥
अर्थ तो सांगतां येना । बुद्धि दे रघुनायका ॥६॥
प्रसंग वेळ तर्कना । सुचेना दीर्घ सूचना ॥
मैत्रिकी राखितां येना । बुद्धि दे रघुनायका॥७॥
कळेना स्फूर्ति होईना । आपदा लागली बहु ॥
प्रत्यहीं पोट सोडीना । बुद्धि दे रघुनायका ॥८॥



मानसं दुर्निवारं मे वासना प्रबला सदा ।
विकल्पो धावति स्वैरं बुद्धिं मे देहि राघव ॥२॥
अन्नं नास्ति न वा वस्त्रं न वा सौख्यं जने तथा ।
आश्रयो दृश्यते नैव बुद्धिं मे देहि राघव ॥३॥
जाने न समुदाचारं किं कर्तव्यं न बुध्यते ।
पीडितोऽहं भृशं लोकैर्बुद्धिं मे देहि राघव ॥४॥
जातोऽस्मि भारवाहस्ते परिश्रान्तश्च कर्मसु ।
सौख्यं न दृश्यते क्वापि बुद्धिं मे देहि राघव ॥५॥
न युक्तं लिखितुं शक्तः स्खलितो वाचने सदा ।
अर्थो न शक्यते वक्तुं बुद्धिं मे देहि राघव ॥६॥
प्रसङ्गं नैव जानामि दूरदृष्टिर्न विद्यते ।
स्नेहो न शक्यते पातुं बुद्धिं मे देहि राघव ॥७॥
ज्ञानं वा स्फुरणं नास्ति भीषणाः सन्ति चापदः।
प्रत्यहं जीविकाचिन्ता बुद्धिं मे देहि राघव ॥८॥

संसार नेटका नाहीं । उद्वेग वाटतो जिवीं ॥
परमार्थू कळेना कीं । बुद्धि दे रघुनायका ॥९॥
देइना पुरविना कोणी । उगेचि जन हांसती ॥
विसरू पडतो पोटीं । बुद्धि दे रघुनायका ॥१०॥
पिशुनें वाटती सर्वे । कोणीही मजला नसे ॥
समर्थां तूं दयासिंधू । बुद्धि दे रघुनायका ॥११॥
उदास वाटतें जीवीं । आतां जावें कुणीकडे ॥
तूं भक्तवत्सला रामा । बुद्धि दे रघुनायका॥१२॥
काया वाचा मनोभावें । तुझा मी म्हणवीतसें ॥
हे लाज तुजला माझी । बुद्धि दे रघुनायका ॥१३ ॥
सोडवील्या देव कोटी । भूमार फेडिला बळें ॥
भक्तांसि आश्रयो मोठा । बुद्धि दे रघुनायका ॥१४॥
उदंड भक्त तुम्हांला । आम्हांला कोण पूसतें ॥
ब्रीद हें राखणें आधीं । बुद्धि दे रघुनायका ॥१५॥



गार्हस्थ्यं न यथायोग्यं समुद्वेगश्च जीविते ।
जाने न परमार्थं वा बुद्धिं मे देहि राघव ॥९॥
न यच्छन्ति न पश्यन्ति व्यर्थं लोका हसन्ति तु।
विस्मृतिर्जायते चित्ते बुद्धिं मे देहि राघव ॥१०॥
सर्वेऽपि पिशुना भान्ति विद्यते न च बान्धवः ।
दयासिन्धुः समर्थस्त्वं बुद्धिं मे देहि राघव ॥११॥
सोद्वेगं वर्तते चित्तं क्व गन्तव्यं न बुध्यते ।
त्वं भक्तवत्सलो राम ! बुद्धिं मे देहि राघव ॥१२॥
कायेन मनसा वाचा प्रतिजाने तवास्म्यहम् ।
मत्तस्तवैव लज्जा स्यात् बुद्धिं मे देहि राघव ॥१३॥
देवकोट्यस्त्वया मुक्ता भूभारो नाशितस्तथा ।
भक्तानां महदाधार बुद्धिं मे देहि राघव ॥१४॥
असंख्याः सन्ति ते भक्ता वार्तां पृच्छति कोऽथ नः ।
प्रतिज्ञा रक्षणीया ते बुद्धिं मे देहि राघव ॥१५॥

आशा हे लागली मोठी । दयाळू बा दया करीं ॥
आणीक नलगे कांही । बुद्धि दे रघुनायका
॥१६॥
उदंड ऐकिली कीर्ति । पतीतपावना प्रभो ॥
मी एक रंक दुर्बुद्धी । बुद्धि दे रघुनायका ॥१७॥
रामदास म्हणे माझा । संसार तुज लागला ॥
संशयो लागतो पोटीं।बुद्धि दे रघुनायका ॥१८॥

★

## अष्टक ६ वें (भुजंगप्रयातवृत्त)

समाधान साधूजनाचेनि योगें ।
परी मागुतें दुःख होतें वियोगें ॥
घडीनें घडी शीण अत्यंत वाटे ।
उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥१॥
घरें सुंदरे सौख्य नाना परीचें ।
परी कोण जाणेल ते अंतरींचे ॥



प्रबला मे मनस्याशा दयासिन्धो दयस्व मे ।
अन्यत्किमपि नेच्छामि बुद्धिं मे देहि राघव
॥१६॥
श्रुता ते महती कीर्तिः पतितोद्धारक प्रभो ।
दुर्बुद्धिरतिदीनोऽस्मि बुद्धिं मे देहि राघव ॥१७॥
रामदासो वदत्येवं जीवितं मे त्वदर्पितम् ।
संशयो वर्धते चित्ते बुद्धिं मे देहि राघव ॥१८॥

★

## अष्टकं षष्ठम् (भुजङ्गप्रयातवृत्तम्)

सुखं प्राप्यते सङ्गतेः साधुलोकैः
वियोगात्तु तैर्जायते तीव्रदुःखम् ।
मुहुर्मानसं खिद्यते मेऽतिमात्रम्
परं क्वापि नो यात्युदासीनकालः ॥१॥
सुसद्मानि सौख्यानि नानाविधानि
परं मानसस्य स्थितिं को नु वेत्ति ।

मनीं आठवीतांचि तो कंठ दाटे ।
उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥२॥
बळें लावितां चित्त कोठें जडेना ।
समाधान तें काहिं केल्या घडेना ॥
नव्हे धीर नयनीं सदा नीर लोटे ।
उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥३॥
अवस्था मनीं लागली काय सांगों ।
गुणीं गुंतला हेत कोणासि मागों ॥
बहूसाल भेटावया प्राण फूटे ।
उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥४॥
कृपाळूपणें भेट रे रामराया ।
वियोगें तुझ्या सर्व व्याकूळ काया ॥
जनामजिं लौकीक हा ही न सूटे ।
उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥५॥



तदन्तः स्मरन् रुद्धकण्ठो भवामि
परं क्वापि नो यात्युदासीनकालः ॥२॥
न शक्यं मनः क्वापि योक्तुं प्रसह्य
कथञ्चित् न सन्तोषलाभोऽपि चित्ते ।
सदा चक्षुषी धैर्यहीने सबाष्पे
परं क्वापि नो यात्युदासीनकालः ॥३॥
कथं वर्णयानि स्थितिं मानसस्य
गुणेषु प्रलीनं मनः कं हि याचे ।
चिरात् सोत्सुकः सङ्गमायैष आत्मा
परं क्वापि नो यात्युदासीनकालः ॥४॥
रघूणां पते पश्य मां सानुकम्पम्
इदं व्याकुलं त्वद्वियोगाच्छरीरम् ।
प्रतिष्ठारतिर्नैव मां मुञ्चतीयम्
परं क्वापि नो यात्युदासीनकालः ॥५॥

अहा रे विधी ! त्वां कसें काय केले ।
पराधीनता पाप माझें उदेलें ॥
बहूतांमध्यें चूकतां तूक तूटे।
उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥६॥
समर्था मनीं सांडि माझी नसावी ।
सदा सर्वदा भक्तचिंता असावी ॥
घडेना तुझा योग हा प्राप्त खोटें ।
उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥७॥
अखंडीत हे सांग सेवा घडावी ।
न होतां तुझी भेटि काया पडावी ।
दिसंदीस आयुष्य हें व्यर्थ आटे ।
उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥८॥
भजों काय सर्वांवरी हीन देवा ।
करूं काय रे सर्व माझाचि ठेवा ॥



विधे भोस्त्वयैतत् कृतं किं कथं वा
यतोऽहं पराधीनतापापदग्धः ।
जनेषु स्खलन् स्नेहशून्यो भवामि
परं क्वापि नो यात्युदासीनकालः ॥६॥
न मे विस्मृतिः स्यात् प्रभो मानसे ते
सदा सर्वदा भक्तचिन्तां वहस्व ।
त्वया सङ्गमो नास्त्यसारे प्रपञ्चे
परं क्वापि नो यात्युदासीनकालः ॥७॥
सदाऽखण्डिता साङ्गसेवा तवाऽस्ताम्
अदृष्टे त्वयि द्राक्पतत्वेष कायः ।
क्षयं प्रत्यहं यात्यसारं ममायुः
परं क्वापि नो यात्युदासीनकालः ॥८॥
कथं वा भजेयं प्रभो हीनदीनः
किमेतस्य कुर्वीय मे सञ्चितस्य ।

म्हणों काय मी कर्मरेखा न लोटे ।
उदासीन हा काळ कोठें न कंठे ।।९।।
म्हणे दास मी वास पाहें दयाळा ।
रघूनायका भक्तपाळा भुपाळा ।।
पहावें तुला हें जिवीं आर्त मोठें ।
उदासीन हा काळ कोठें न कंठे ।।१०।।

★

## अष्टक ७ वें (भुजंगप्रयातवृत्त)

उदासीन हा काळा जातो गमेना ।
सदा सर्वदा थोर चिंता शमेना ।।
उठे मानसीं सर्व सोडोनि जावें ।
रघूनायका काय कैसें करावें ।।१।।
जनीं बोलतां बोलतां वीट वाटे ।
नसे अंतरी सूख कोठें न कंठे ।।



अबाध्या ललाटे लिपिः किं वदानि
परं क्वापि नो यात्युदासीनकालः ।।९।।
दयालो प्रतीक्षेयमित्याह दासः
रघूणां पते भक्तपाल प्रभो हे ।
प्रभो प्रेक्षितुं त्वां भृशं चित्तमार्तम्
परं क्वापि नो यात्युदासीनकालः ।।१०।।

★

## अष्टकं सप्तमम् (भुजङ्गप्रयातवृत्तम्)

उदासस्य मे याति कालः सदुःखम्
कथंचिन्न घोरैति चिन्तोपशान्तिम् ।
स्पृहा जायते सर्वमुत्सृज्य गन्तुम्
रघूणां पते कि कथं वर्तितव्यम् ।।१।।
जनेष्वालपन्नुद्विजे सद्य एव
न वा चेतसि स्वास्थ्यमत्यल्पमात्रम् ।

घडीनें घडी चित्त कीती धरावें ।
रघूनायका काय कैसें करावें ॥२॥
बहू पाहतां अंतरीं कोंड होतो ।
शरीरास तो हेत सांडोनि जातो ॥
उपाधीस देखोनि वाटे सरावें ।
रघूनायका काय कैसें करावें ॥३॥
अवस्था मनीं होय नानापरींची ।
किती काय सांगूं गती अंतरींची ॥
विवेकेंचि या मानसा आवरावें ।
रघूनायका काय कैसें करावें ॥४॥
म्हणे दास ऊदास जालों दयाळा ।
जनीं व्यर्थ संसार हा वायचाळा ॥
तुझा मी तुला पूसतों प्रेमभावें ।
रघूनायका काय कैसें करावें ॥५॥

★



कथं वा पुनश्चित्तमाश्वासयेयम्
रघूणां पते कि कथं वर्तितव्यम् ॥२॥
विकल्पैरनेकैर्मनः क्षोभमेति
विवेकोऽनुकूलः शरीरं जहाति ।
उपाधीन् प्रपश्यन् विरक्तो भवामि
रघूणां पते कि कथं वर्तितव्यम् ॥३॥
अवस्था हि नानाविधाश्चेतसो मे
कथं वर्णये दुःस्थितिं मानसस्य ।
विवेकेन चित्तं समाश्वासनीयम्
रघूणां पते कि कथं वर्तितव्यम् ॥४॥
उदासोऽहमित्याह दासो दयालो
असारः प्रपंचो हि मायेन्द्रजालम् ।
तवैवास्मि पृच्छामि भक्त्या प्रभो त्वाम्
रघूणां पते कि कथं वर्तितव्यम् ॥५॥

★

## अष्टक ८ वें (उपेंद्रवज्रावृत्त)

तुझिया वियोगें जीवित्व आलें ।
शरीरपांगें बहु दुःख झालें ॥
अज्ञान दारिद्य माझें सरेना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ॥१॥
परतंत्र जीणें कंठूं किती रे ।
उच्चाट माझे मनीं वाटतो रे ॥
लल्लाटरेखा तरि पालटेना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ॥२॥
जडली उपाधी अभिमान साधी ।
विवेक नाहीं बहुसाल बाधी ॥
स्वामी वियोगें पळही गमेना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ॥३॥



## अष्टकं अष्टमम् (उपेन्द्रवज्रावृत्तम्)

त्वया वियोगः खलु जीवहेतुः
शरीरयोगस्त्वसुखाय जातः ।
जहाति नाज्ञानदरिद्रता माम्
न हि राम कुत्रापि रमे विना त्वाम् ॥१॥
कथं नयेयं परनिघ्नमायुः
मनोऽपि खिन्नत्वमुपैति नूनम् ।
विपर्ययं नो विधिलेख एति
न हि राम कुत्रापि रमे विना त्वाम् ॥२॥
उपाधिबद्धश्च हतोऽस्मि गर्वात्
विवेकहानिर्बहु बाधते माम् ।
त्वया वियुक्तस्य पलं न सौख्यम्
न हि राम कुत्रापि रमे विना त्वाम् ॥३॥

विश्रांति देहीं अणुमात्र नाहीं ।
कुळाभिमानें पडिलों प्रवाहीं ॥
स्वहीत माझें होतां दिसेना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ॥४॥
विषयी जनानें मज लाजवीलें ।
प्रपंचसंगें आयुष्य गेलें ॥
समयीं बहु क्रोध शांती घडेना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ॥५॥
संसारसंगे बहु पीडलो रे ।
कारुण्यसिंधु मज सोडवीं रे ॥
कृपाकटाक्षें सांभाळिं दीना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ॥६॥
सद्दढ जाली देहेबुद्धि देहीं ।
वैराग्य कांही होणार नाहीं ॥



कदापि विश्रामसुखं न काये
कुलाभिमानेन पथश्च्युतोऽस्मि ।
हितं न पश्यामि तथाऽपि लभ्यम्
न हि राम कुत्रापि रमे विना त्वाम् ॥४॥
कृतोपहासोऽस्म्युपभोगमग्नैः
गतं ममायुश्च कुटुम्बहेतोः ।
मुहुश्च कोपो हृदि नैव शान्तिः
न हि राम कुत्रापि रमे विना त्वाम् ॥५॥
भृशं कुटुम्बस्य कृतेऽस्मि खिन्नः
दयाम्बुधे मोचय मां हताशम् ।
कृपाकटाक्षेण च पाहि दीनम्
न हि राम कुत्रापि रमे विना त्वाम् ॥६॥
दृढास्ति मे देहिनि देहबुद्धिः
न जागृयाच्चेतसि मे विरागः ।

अपूर्व कामीं मन हे विटेना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ॥७॥
निरूपणीं हे सद्वृत्ति होते ।
स्थळत्याग होतां सवेंचि जाते ॥
काये करूं रे क्रीया घडेना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ॥८॥
जय जय दयाळा त्रैलोक्यपाळा ।
भवसिंधुहारी मज तारि हेळा ॥
स्वामी वियोगें पळही गमेना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ॥९॥
आम्हां अनाथां तू एक दाता ।
संसारचिंता चुकवी समर्था ॥
दासा मनीं आठव वीसरेना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ॥१०॥



अपूर्णकामान्न मनो निवृत्तम्
न हि राम कुत्रापि रमे विना त्वाम् ॥७॥
निरूपणात् सत्त्वगुणोदयोऽस्ति
स चास्तमेति स्थलविप्रकर्षात् ।
न मे क्रिया चापि किमाचरेयम्
न हि राम कुत्रापि रमे विना त्वाम् ॥८॥
दयानिधे पाहि जगत्त्रयेश
भवोदधेस्तारय लीलया माम् ।
त्वया विमुक्तस्य पलं न सौख्यम्
न हि राम कुत्रापि रमे विना त्वाम् ॥९॥
त्वमेव नोऽनाथजनस्य दाता
कुटुम्बचिन्तां हर शीघ्रमीश ।
न विस्मरः स्यात् स्मर दासमेनम्
न हि राम कुत्रापि रमे विना त्वाम् ॥१०॥

## आरती रामचंद्राची

(आत्मारामाची आरती)

जय देव जय देव आत्मया रामा ।
निगमागम शोधितां न कळे गुणसीमा ॥ध्रु.॥

नाना देहीं देव एक विराजे ।
नाना नाटकलीला सुंदर रुप साजे ।
नाना तीर्थीं क्षेत्रीं अभिनव गति साजे ।
अगाध महिमा पिंडब्रह्मांडी गाजे ॥१॥

बहुरूपी बहुगूणी बहुतां काळांचा ।
हरिहर ब्रह्मादिक देव सकळांचा ।
युगानुयुगीं आत्माराम आमुचा ।
दास म्हणे महिमा न बोलवे वाचा ॥२॥



## आरतिः रामचन्द्रस्य।

(आत्मारामस्य आरतिः।)

जय देव जय देव जय जयाऽत्मराम ।
निगमागम-पठनात् तव न वेद्मि गुणसीम ॥ध्रु.॥

नानाव्यक्तिषु एको देवो हि राजते
नानानाटकलीलाः सुभगाः शोभन्ते ।
बहुतीर्थक्षेत्रेषु प्रभुसारोऽभिनवः
पिण्डे च ब्रह्माण्डे ख्यातः तन्महिमा ॥१॥

बहुरूपो भूरिगुणः स हि कालातीतः
ब्रह्महरिहरादीनां सकलानां नाथः ।
नैकेभ्यो हि युगेभ्यो नः स आत्मरामः
दासो ब्रूते तस्य न वाग्गोचरमहिमा ॥२॥

## ॥ समारोपणम् ॥

इत्थं यथामति मया करुणाष्टकानि
श्रीरामदासरचितान्यनुवादितानि ।
श्रीरामपादयुगले च समर्पितानि
तेन प्रभुर्मयि करोतु कपाकटाक्षम् ॥१॥
श्रीमत्समर्थ-रचितान् विपुलार्थगर्भान्
गीर्वाणवागनुगताँश्च सुखावबोधान् ।
श्लोकान् पठन्ति दृढभक्तिसमन्विता ये
तान् भक्तिपूर्णहृदयान् रघुनाथ रक्ष ॥२॥
प्राकृते मारुतिस्तोत्रं रामदासेन निर्मितम् ।
हनूमते समर्प्यैतत् लेभे श्रीरामदर्शनम् ॥३॥
भोः समर्थ ! न जानामि रामभक्तिश्च कीदृशी ।
अनुवाद्य तव श्लोकान् तुभ्यमेव ददाम्यहम् ॥४॥
अदापयत् यथा तुभ्यं मारुती रामदर्शनम् ।
विज्ञाप्य मारुतिं मह्यं दापय प्रभुदर्शनम् ॥५॥

– संस्कृतस्य किंकरः ।





## आरतिः रामदासस्य (स्वैरः अनुवादः)

(मूला मराठी-आरतिः 'आरती रामदासा')

आरतिः रामदास ते
भक्तिविरक्तिमूर्ते ।
उदितो(नु) ज्ञानसूर्यः
तेजो विश्वाय दत्ते ॥धृ॥
प्रत्यक्षं शंकरस्य
अवतारः श्रीमारुतिः ।
मन्येऽहं (स) कलौ युगे
साधु-रामदास-मूर्तिः ॥१॥
(अहो) विंशतिदशकानाम्
दासबोधं लिखितवान् ।
जड-जीवान् उद्धृतवान्
शिवभूपं तारितवान् ॥२॥
यो ब्रह्मचर्यम् आचरत्
ददर्श च राममयसृष्टिम् ।
अलं त्रैलोक्यहिताय
समर्थगुरुचरणयुगम् ॥३॥

